# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४२
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/1261 दिनांक : ३ मे,१९९९

## //परिपत्रक क्र.१७//

**विषय** : निविदा स्वीकृतीचे अधिकार
**संदर्भ** : १) दि.२१/६/९१ चे परिपत्रक क्र.मपापुजनिमं/विशा-३/डेपॉ/५३३/९१.
२) दि.३/२/९८ चे परिपत्रक क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३३३
३) दि.२/३/९८ चे परिपत्रक क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/६३०
४) दि.१९/१२/९८ चे परिपत्रक क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/४११७

वरील संदर्भीय परिपत्रकांनुसार रु.२५०/- लाखांवरील व रु.५००/- लाख किंमतीपर्यंतच्या सर्व निविदांच्या छाननीसाठी संबंधित मुख्य अभियंता,अन्य एक प्रादेशिक मुख्य अभियंता व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या समितीचे गठन केले आहे.

वरील समितीच्या शिफारशीनंतर रु.२५०/- लाखावरील व रु.५००/- लाखापर्यंतच्या ज्या निविदासाठीचे देकार चालू दरसूचीनुसार येणाऱ्या कामांच्या किंमती इतके किंवा त्यापेक्षा कमी आहेत अशा निविदा स्वीकृतीचे अधिकार विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता अथवा सदस्य सचिव(तांत्रिक) यांना आहेत.

या परिपत्रकांव्दारे सूचना देण्यांत येत आहेत की, अशा निविदांसाठी , संदर्भीय दि.१९/१२/९८ च्या परिपत्रकात उल्लेख केलेल्य समितीच्या शिफारशीची आवश्यकता नाही. यापुढे अशा निविदांचे प्रस्ताव संबंधित मुख्य अभियंत्यांनी वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्यामार्फत विशेष कार्य अधिकारी (जेथे लागू असेल तेथे) अथवा सदस्य सचिव(तांत्रिक) यांना सादर करावेत.

सर्व संबंधितांनी वरील बदलाची नोंद घ्यावी. वरील निर्णय या परिपत्रकाच्या दिनांकापासून लागू राहतील.

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव(तांत्रिक)

प्रत :-
मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई-३२

मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई-३२

..२..